|| आजचा सुविचार ||

आयुष्य हे सायकल
चालवण्यासारखे आहे,
तोल सांभाळण्यासाठी
चालत राहणे आवश्यक आहे.

दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ३८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२१ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पेट्रोल पंपांच्या 'यूपीआय' शुल्क विरोधावर फडणवीसांचा पलटवार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नागपूर :** मध्य प्रदेशातील पेट्रोल पंप चालकांनी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेचे यूपीआय व्यवहार स्वीकारणार नसल्याची भूमिका घेतल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून या भूमिकेला विरोध करण्यात आला आहे. यूपीआयमुळे पेट्रोल पंप चालकांचा व्यवसाय वाढला असून, मोठ्या प्रमाणात ग्राहक डिजिटल पेमेंटचा वापर करत आहे. त्यामुळे भविष्यात यूपीआय व्यवहारांवर नाममात्र शुल्क आकारण्याच्या प्रस्तावाला व्यापारी आणि पेट्रोल पंप चालकांनी विरोध करू नये, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून व्यक्त करण्यात आले.

यूपीआय आणि डिजिटल व्यवहारांमुळे देशातील व्यवहार अधिक सुलभ झाले असून, व्यापार वाढविण्यासोबतच भ्रष्टाचार कमी करण्यासही त्याचा मोठा फायदा झाला आहे. त्यामुळे डिजिटल पेमेंटची सुविधा कायम ठेवत त्याचा विस्तार करण्याची गरज आहे. यूपीआय व्यवहारांसाठी अतिशय नाममात्र शुल्क आकारण्याचा प्रस्ताव असल्याचे सरकारकडून सांगण्यात येत आहे. मात्र, या प्रस्तावाबाबत गैरसमज निर्माण केला जात आहे.

यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्यासंदर्भात संसदीय समितीने यापूर्वी शिफारस केली होती, असा दावा करण्यात आला. या समितीत काँग्रेससह तत्कालीन यूपीएतील काही प्रमुख नेते सहभागी होते आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांचाही त्यात समावेश होता. त्यामुळे आता यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्याच्या प्रस्तावाला विरोध करताना या पूर्वीच्या शिफारसींचाही विचार करावा, असा युक्तिवाद मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आला.

प्रस्तावित शुल्क सर्व व्यवहारांवर मोठ्या प्रमाणात लावले जाणार नसून काही विशिष्ट किंवा छोट्या व्यवहारांपुरतेच त्याचे स्वरूप असेल. त्यामुळे ग्राहक आणि व्यापाऱ्यांमध्ये अनावश्यक गैरसमज निर्माण करण्याऐवजी डिजिटल व्यवहारांच्या व्यापक फायद्यांचा विचार करण्याची गरज आहे. यूपीआयच्या माध्यमातून व्यवहार करण्याची सवय देशभरात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पेट्रोल पंपांवरही ग्राहकांकडून डिजिटल पेमेंटचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे यूपीआय सुविधा बंद करण्याऐवजी त्या माध्यमातून होणारे व्यवहार अधिक सुरक्षित आणि सुलभ करण्यावर भर देणे आवश्यक आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, महाराष्ट्रात पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासाच्या योजनांवरही सरकारकडून भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. समृद्धी




महामार्गालगत मालवाहतुकीसाठी स्वतंत्र डेडिकेटेड फ्रेट रेल्वे मार्ग उभारण्याचा प्रस्ताव असून, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला त्याचा डीपीआर तयार करण्याचे काम देण्यात आले आहे.

वाढवण आणि जवाहरलाल नेहरू पोर्टवरून नाशिक, जालना, सेलू, वर्धा आणि गडचिरोलीपर्यंत मालवाहतूक रेल्वे जोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच सावनेर परिसरात संरक्षण, न्यूक्लियर आणि एरोस्पेस क्षेत्रातील प्रकल्पांसाठी सुमारे पाच हजार एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागपूरच्या इंजिनिअरिंग महाविद्यालयांमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून भरती सुरू असून, उच्च पगाराच्या रोजगाराच्या संधी निर्माण होत आहे. त्याव्यतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक परिसरात चार कंपन्या सुरू झाल्या असून, देशातील मोठ्या सोलर मॉड्यूल उत्पादक कंपन्यांपैकी एक कंपनी तेथे कार्यरत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या इंदौर येथील कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मिमिक्री करण्यात आल्याच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी आणि काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले की, राहुल गांधींना एवढेच काम उरले आहे की, कोणाच्या नकला करायच्या. त्यामुळे त्यांनी स्टँड-अप कॉमेडीमध्ये काम केले पाहिजे. त्यामुळे त्यांना रोजगार तरी मिळेल, कारण त्यांच्या पार्टीलाच आता कुठले काम उरलेले नाही, अशी टीका मुख्यमंत्री यांनी केली.

# एसटीच्या ताफ्यात २०० अत्याधुनिक व्होल्वो बसेस

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, मुंबई :** महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांची विश्वासार्ह लोकवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाने लांब पल्ल्याच्या आरामदायी प्रवासासाठी नवी झेप घेण्याची तयारी केली आहे. खासगी आराम बससेवांकडे वळणाऱ्या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी महामंडळाच्या ताफ्यात लवकरच स्वमालकीच्या २०० अत्याधुनिक, वातानुकूलित व्होल्वो बसेस दाखल करण्यात येणार आहेत. सुरक्षितता, आरामदायीपणा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दर्जेदार प्रवासी सेवेचा संगम या सेवेत असणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रथमच एसटीच्या ताफ्यात व्होल्वो बसेसचा समावेश होणार आहे.

लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी अनेक प्रवासी अधिक भाडे देऊन खासगी आराम बससेवेला पसंती देतात. या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी खासगी आराम बससेवेच्या तोडीची आधुनिक व विश्वासार्ह सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.




**• दिवसा आरामदायी, रात्री शयनयान प्रवास**

२५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या आणि किमान पाच ते सहा तासांच्या प्रवासासाठी ४५ आसनी आरामदायी बसेस उपलब्ध करण्यात येणार आहेत. रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ३० किंवा ४५ शयनयान क्षमतेच्या बसेस उपलब्ध करून देण्यात येतील.

**• मोबाईलवरून घरबसल्या आरक्षण**

नव्या आराम बससेवेसाठी एसटीच्या अधिकृत ऑनलाईन आरक्षण व्यवस्थेबरोबरच खासगी डिजिटल ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मवरूनही तिकीट आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. प्रवाशांना मोबाईलवरून बसची वेळ, मार्ग आणि उपलब्ध आसनांची माहिती घेऊन घरबसल्या आरक्षण करता येणार आहे.

**• खासगी संस्थेकडून आतिथ्य व्यवस्थापन**

प्रवाशांना केवळ आरामदायी बस नव्हे, तर दर्जेदार प्रवासी सेवेचा अनुभव मिळावा यासाठी व्होल्वो बसेसमधील आतिथ्य व्यवस्थापनासाठी खासगी संस्थेची मदत घेण्यात येणार आहे. प्रवाशांचे स्वागत, स्वच्छता, मूलभूत सुविधा, आवश्यक माहिती आणि सेवा-सुविधांच्या व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाचा वापर केला जाणार आहे.

**• मागणीच्या मार्गांचा सर्वंकष अभ्यास**

महाराष्ट्रातील तसेच आंतरराज्य मार्गांवर खासगी आराम बससेवेला मोठी मागणी असलेल्या मार्गांचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रवाशांची संख्या, मागणी, उपलब्ध सेवा, अंतर, प्रवासाचा कालावधी आणि आर्थिक व्यवहार्यता यांचा विचार करून मार्गांचे सर्वेक्षण केले जाईल. त्यानंतर व्होल्वो आणि शयनयान बसेससाठी मार्ग निश्चित करण्यात येतील.

आधुनिक सुविधा, डिजिटल आरक्षण व्यवस्था आणि दर्जेदार आतिथ्यसेवेची जोड देऊन लांब पल्ल्याच्या प्रवासी सेवेत नवे मानदंड निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# चंद्रपूर पोलिसांच्या ताफ्यात १४ नवीन वाहने

## दोन अत्याधुनिक मोबाईल सीसीटीव्ही व्हॅन सेवेत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच पोलिसांच्या कार्यक्षमतेला आणि गतिशीलतेला बळ देण्यासाठी चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाच्या ताफ्यात १४ नवीन वाहने दाखल झाली आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीतून उपलब्ध झालेल्या या वाहनांचा लोकार्पण सोहळा शनिवारी, १९ सप्टेंबर रोजी पोलीस मुख्यालय, चंद्रपूर येथे उत्साहात पार पडला. यासोबतच शहरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी दोन अत्याधुनिक मोबाइल सीसीटीव्ही सर्व्हिलन्स व्हॅनही सेवेत दाखल करण्यात आल्या. महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या मोबाइल सीसीटीव्ही व्हॅन आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. संवेदनशील भाग, मोर्चे, सण-उत्सव तसेच मोठ्या गर्दीच्या ठिकाणी या व्हॅनचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे घटनास्थळी पोहोचून परिस्थितीवर थेट नजर ठेवणे आणि आवश्यकतेनुसार तातडीने निर्णय घेणे पोलिसांना शक्य होणार आहे.

या व्हॅनवर उच्च क्षमतेचे पीटीझेड तसेच नाईट-व्हिजन कॅमेरे बसविण्यात आले आहेत. ३६० अंशात फिरणारे हे कॅमेरे परिसराचे स्पष्ट चित्रण करण्यास सक्षम आहेत. कॅमेऱ्यांद्वारे मिळणारे दृश्य मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी जोडण्यात येणार असल्याने अधिकारी घटनास्थळावरूनच परिस्थितीचे निरीक्षण करू शकणार आहेत. व्हॅनमध्ये आधुनिक मॉनिटर्स, व्हिडिओ रेकॉर्डिंग व स्टोरेजची सुविधा तसेच सार्वजनिक घोषणा प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थिती, गर्दी नियंत्रण किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास या सुविधांचा तातडीने वापर करता येणार आहे.

यावेळी खासदार प्रतिभा सुरेश धानोरकर, विधान परिषद सदस्य सुधाकर अडबाले, आ. किशोर जोरगेवार, आ. देवराव भोंगळे आणि आ. करण देवतळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वसुमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, चंद्रपूर मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

तसेच पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार, प्रशासकीय अधिकारी आणि प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून प्राप्त झालेल्या १४ नवीन वाहनांमुळे जिल्ह्यातील पोलीस गस्त अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे. कायदा व सुव्यवस्था राखणे, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने घटनास्थळी पोहोचणे तसेच पोलिसांच्या दैनंदिन कार्याला अधिक गतिमान करण्यासाठी या वाहनांचा उपयोग होणार आहे. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याच्या दिशेने चंद्रपूर पोलीस दलाने आणखी एक पाऊल टाकले आहे. पोलीस अधीक्षक आयुष नोपानी आणि अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस मोटार परिवहन विभाग, पोलीस कल्याण विभाग, बिनतारी संदेश विभाग, सायबर पोलीस स्टेशन आणि पोलीस मुख्यालयातील अधिकारी व अंमलदारांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

# विंचूर परिसरात पावसाच्या ओढीसह विजेचा लपंडाव; मका, सोयाबीन पिके धोक्यात

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** विंचूर आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. कडक ऊन आणि कोरड्या हवामानामुळे मका व सोयाबीन पिके सुकण्याच्या मार्गावर असून शेतातच पाने कोमेजू लागली आहेत. त्यातच महावितरणकडून सुरू असलेल्या विजेच्या लपंडावामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत मोठी भर पडली असून शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने मका, सोयाबीनसह इतर पिकांची चांगली उगवण झाली होती. शेतकऱ्यांनी महागडी बियाणे, खते आणि मजुरीवर मोठा खर्च करून पिके जोपासली. मात्र, ऐन वाढीच्या काळातच पावसाने प्रदीर्घ विश्रांती घेतल्यामुळे जमिनीतील ओलावा संपुष्टात आला आहे. सध्या पिकांना दाणे भरण्याच्या आणि वाढीच्या अवस्थेत पाण्याची अत्यंत नितांत गरज आहे. वीज वितरणचा खेळखंडोबा; सिंचनाचे नियोजन कोलमडले विहिरी आणि बोअरवेलमध्ये थोडेफार पाणी



शिल्लक असले तरी वीजपुरवठ्याच्या खेळखंडोबामुळे पिकांना पाणी देणे अशक्य होत आहे. दिवसा आणि रात्री वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने मिळणारी वीज यामुळे कृषिपंप चालवणे कठीण झाले आहे. वीज कधी येईल आणि कधी जाईल याचा नेम नसल्याने शेतकऱ्यांना भररात्री शेतात ताटकळत बसावे लागत आहे. आणखी काही दिवस पाऊस न झाल्यास ही पिके पूर्णपणे जळून हातचे जाण्याची भीती व्यक्त होत असून उत्पादनात प्रचंड घट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने शेतीसाठी अखंडित आणि सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी जोरदार मागणी विंचूर परिसरातील शेतकरी करत आहेत.

> पाऊस नसल्याने मका आणि सोयाबीनची पिके डोळ्यादेखत जळत आहेत. खते, बियाण्यांवर केलेला मोठा खर्चही निघेल की नाही अशी स्थिती आहे. विहिरीत शिल्लक असलेल्या पाण्यावर पिके जगवण्याचा प्रयत्न करतोय, पण वीज अजिबात टिकत नाही. वारंवार वीज जात असल्याने पिकांना पाणी भरता येत नसून आमचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे.
>
> **– भरत जाधव, शेतकरी, विंचूर**




## सांस्कृतिक अड्ड्यांचे बदलते पत्ते

यूपीए-२चं सरकार होतं त्या काळात दिल्लीशी माझी पहिली खरीखुरी ओळख झाली ती संसद भवनाच्या परिसरात, मंत्रालयांच्या दालनांत किंवा इंडिया गेट, मंडी हाउस वगैरेंच्या विस्तीर्ण रस्त्यांवर नव्हे; ती झाली कॅनॉट प्लेस भागात इरविन मशिदीसमोरच्या मोहनसिंग पॅलेसच्या वरच्या मजल्यावरच्या एका साध्याशा कॉफी हाउसच्या टेबलावर. महाराष्ट्र परिचय केंद्राचे तत्कालीन उपसंचालक गणेश रामदासी मला तिथं घेऊन गेले होते. तिथल्या टेबलांवर नजर टाकू तिकडे कोणी ना कोणी मान्यवर दिसायचेच. गटागटानं चर्चा सुरू असायची. कॉफीचे कप यायचे, रंगणाऱ्या गप्पांमधून दिल्ली हळूहळू उलगडत जायची. दिल्लीतील राजकारणापासून साहित्य-संस्कृतीपर्यंत, संसदेतल्या घडामोडींपासून जुन्या दिल्लीच्या गल्लीबोळांपर्यंत आणि कुलदीप नय्यर, कपिला वात्स्यायन, अमृता प्रीतम यांचे यजमान इमरोज यांच्यासारख्या मान्यवरांना कुठं भेटावं इथपासून पुस्तकांच्या कुठल्या दुकानात काय मिळेल इथपर्यंत या गप्पा रंगत. एका टेबलावर कविता, दुसऱ्यावर राजकारण, तिसऱ्यावर नाटक आणि चौथ्यावर पत्रकारिता – अशा चर्चांतून दिल्ली समजत जायची. पुढं मद्रास कॉफी हाउस, टी हाउस, शनिवार समाज, दरियागंजचं हिंद पॉकेट बुक्स, जेएनयूचे वेगवेगळे ढाबे, कॉन्स्टिट्यूशन क्लब, इंडिया इंटरनॅशनल किंवा हॅबीटॅट सेंटरच्या प्रशस्त रेस्टॉरंटसारखे असेच अनेक अड्डेही पालथे घातले तेव्हा दिल्लीचं वेगळं रूप हळूहळू समोर यायला लागलं. दिल्लीची अशी जी तोंडओळख झाली ती केवळ रस्ते-पत्त्यांची नव्हती. त्या नकाशावर संसद किंवा मंत्रालयांपेक्षा कॉफी हाउस, पुस्तकांची दुकानं, पत्रकारांचे अड्डे, साहित्यिकांच्या बैठकांची ठिकाणं आणि जुन्या दिल्लीच्या गल्लूया अधिक महत्त्वाच्या होत्या. इंडियन कॉफी हाउससारखे गप्पांचे अड्डे संपलेले नाहीत; पण या सांस्कृतिक नकाशातील अनेक ठिकाणं मात्र बदलली किंवा नाहीशी झाली. अशा ठिकाणांचा जुन्या लेखकांच्या आठवणींमध्ये वारंवार उल्लेख येतो. त्यातील काही जागा आजही आहेत; काहींचं रुपडं बदललंय. याची सर्वांत ठळक खूण म्हणजे पुस्तकांची दुकानं. कनॉट प्लेसमधलं बुक होम, डाल्गोटिया, रामकृष्ण अँड सन्स, न्यू बुक डेपो, दरियागंजमधे दिल्ली गेटच्या समोरचा जुन्या पुस्तकांचा खजिना इत्यादींत पुस्तकांची खरेदी तर होतच असे; पण ती वाचकांच्या भेटीची ठिकाणंही होती. न्यू बुक डेपो १९२५मध्ये सुरू झालं आणि २०१२मध्ये बंद झालं. जागांची किंमत, बदलती खरेदीची पद्धत आणि ऑनलाइन बाजार यामुळे पुस्तकांच्या दुकानांचं गणितच बदललं. नयी सडक व दरियागंजचा रविवारचा पुस्तक बाजार पदपथांवरून स्थलांतरित झाला, पण संपला नाही. डिजिटल युगानं सांस्कृतिक अड्ड्यांच्या या बदलाला आणखी वेग दिला. आता लेखक सोशल मीडियावर भेटतात, पुस्तकं ऑनलाइन मागवली जातात आणि चर्चा डिजिटल पडद्यावर होतात. पण अचानक होणारी भेट, तासन्तास रंगणाऱ्या गप्पा आणि त्या गप्पांतून निर्माण होणारे नवे विचार कमीकमी होत गेले. हिंदी साहित्याच्या दिल्लीतल्या अड्ड्यांची संख्या कमी होण्याचा संबंध बदलत्या समाजाशीही आहे. एके काळी दिल्ली हे हिंदी साहित्याचं मोठं केंद्र होतं. अशोक वाजपेयी, कृष्णा सोबती, मोहन राकेश, 'हंस'चे संपादक राजेंद्र यादव, कमलेश्वर यांसारख्या साहित्यिकांची या अड्ड्यांवरही वर्दळ असायची. मराठीसह अनेक भाषांत अशी उदाहरणं आढळतील. तुलनेनं बंगाली व मल्याळी साहित्यानं आपली धार बऱ्यापैकी शाबूत ठेवली आहे. उत्तर भारतीय समाजातही आज मुलांनी करिअरच्या दृष्टीनं इंग्रजीवर अधिक भर द्यावा हा कल वाढला आहे. पालकांनाही हिंदी साहित्य वाचण्यातून मुलांच्या हाती पुढं काय लागणार असा प्रश्न पडतो आहे. अशा स्थितीत साहित्याची ओढ असलेल्या नव्या पिढ्या तयार होणार कशा! आज अख्खं जग आपल्या मोबाइलच्या पडद्यावर सामावलं आहे. पारंपरिक हिंदी साहित्य विकत घेऊन वाचण्यापेक्षा इन्स्टाग्रामसारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म नव्या पिढीला तुलनेनं जवळचे वाटतात. अशा वेगवान जगात लांबलचक कथा किंवा कादंबरी शांतपणे वाचत बसण्याची संस्कृती कमी होणं साहजिकच. या बदलाकडे केवळ तक्रारीच्या नजरेनं पाहू नये. नव्या पिढीच्या बदललेल्या सवयी लक्षात घेऊन हिंदी साहित्यही स्वतःला बदलतं आहे. त्याची शिल्पशैली, कथनाची पद्धत बदलते आहे. कथा आणि कादंबऱ्यांचा वेग वाढला आहे; वाचकाचा धागा सुटू नये, त्याला कंटाळा येऊ नये याची काळजी घेतली जात आहे. या नव्या जगात पूर्वीसारख्या प्रत्यक्ष बैठका, कॉफी हाउसच्या टेबलाभोवतीच्या गप्पा किंवा साहित्यिक अड्डे कदाचित कमी दिसतील. पण चर्चा आता दुसऱ्या पडद्यावर स्थलांतरित झाल्या आहेत. कदाचित म्हणूनच 'सांस्कृतिक अड्डे संपले' असं म्हणण्यापेक्षा त्यांनी आपला पत्ता बदलला आहे, असं म्हणणं अधिक योग्य ठरावं. पूर्वी चार माणसं एका टेबलाभोवती बसून शब्दांना आकार देत होती; संपादकीय बैठकांनाही वेगळं रूप होतं. आज तीच माणसं वेगवेगळ्या शहरांत, वेगवेगळ्या पडद्यांआड बसून शब्दांची देवाणघेवाण करताहेत. जागा बदलली, माध्यम बदललं; पण साहित्याला संवादाची आणि माणसांना एकमेकांशी जोडण्याची गरज अजूनही तशीच आहे.

– मंगेश वैशंपायन

# ...तर बाप्पाची अवकृपा होण्यास वेळ लागणार नाही !

श्रीगणेशमूर्तींच्या आगमनादरम्यान होणाऱ्या अपघातात यंदा याआधीच्या तुलनेत प्रचंड वाढ झाली. मुंबईतील भुलेश्वरच्या राजाची २२ फुटी मूर्ती मंडपात येण्याआधीच कोसळून मोठा अपघात झाला ज्यामध्ये मंडळाच्या अध्यक्षांसह २ जण ठार तर ५ जण घायाळ झाले. नालासोपारा येथील मोरेगाव सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते बाप्पाची मूर्ती ट्रॉलीवरून आणत असताना अचानक मुसळधार पाऊस आणि वेगवान वारा सुरू झाला.

मूर्तीला पावसापासून वाचवण्यासाठी प्लास्टिकचे आच्छादन घालण्याचा प्रयत्न करत असताना ट्रॉलीचा तोल बिघडला आणि गणेशमूर्ती कार्यकर्त्यांच्या अंगावर कोसळली. मुंबईतील धारावी परिसराजवळही आगमन सोहळ्यादरम्यान 'प्रेम नगरचा राजा' या मंडळाची सुमारे १५ फुटांची गणेशमूर्ती कोसळल्याची घटना घडली.

कुर्ल्यातील शीतल तलावाजवळ सुद्धा गणेशमूर्तीची ट्रॉली गतिरोधकात अडकून मूर्ती खाली कोसळली. याखेरीज यंदा श्रीगणेशमूर्तींच्या आगमनादरम्यान अनेक लहान मोठे अपघात घडले ज्यामुळे मूर्तीच्या उंचीबाबतचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गणेशोत्सवात मूर्तीची उंची खरंच भव्य दिव्य असणे गरजेचे आहे का असा प्रश्न आता पुन्हा एकदा भाविकांकडून विचारला जाऊ लागला आहे. ज्या बाप्पाला गणेशोत्सवादरम्यान आपण वाजत गाजत श्रद्धेने मंडपात आणतो त्याच्यासाठी अनेक रात्री जागून सुंदर आरास तयार करतो. त्याच्या १० दिवस मुक्कामाचे उत्तम नियोजन करतो अशा बाप्पाचा आगमनादरम्यान अपघात घडणे किती मोठे दुर्दैव



आहे आणि याला जर आपणच कारणीभूत असू तर त्याचे पातक आपण कसे फेडणार आहोत ? मूर्तीच्या उंचीबाबतचा मुद्दा चर्चेत असतानाच मागच्या वर्षी प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांनी परळचा महाराजा मंडळासाठी बॅलन्सिंग मूर्ती तयार केली ज्याचे त्यावेळी अनेकांनी कौतुक केली. ही बॅलन्सिंग मूर्ती पाहण्यासाठी देशभरातून भाविक परळचा महाराजाला भेट देण्यासाठी आले.

या कलाकृतीमुळे अरुण दत्ते यांचे नाव देशभर चर्चेत आल्याने यंदा त्यांच्याकडे बॅलन्सिंग गणेशमूर्ती तयार करण्याच्या ५० हुन अधिक ऑर्डर्स आल्या. अन्य मूर्तिकारांकडेही यंदा अनेक मंडळांनी बॅलन्सिंग मुर्त्यांची मागणी केली. त्यामुळे त्यांनीही यंदा तसे प्रयत्न केले परिणामी यावेळी मुंबईसह ठाणे आणि पुण्यातही बहुतांश ठिकाणी बॅलन्सिंग बाप्पा पाहायला मिळत आहेत. कलाकृती म्हणून बॅलन्सिंग बाप्पाचे कौतुक केले जात असले तरी जो देव साऱ्या विश्वाला बॅलन्स करतो. त्याला अशा प्रकारे स्वतःचा तोल सावरताना १० दिवस उभा राहिलेला दाखवणे कोणत्याही गणेशभक्तासाठी क्लेशदायकच आहे. हे सर्व बॅलन्सिंग बाप्पा आज गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांत विराजमान झाले असले, तरी अनंत चतुर्दशीला जेव्हा विसर्जनासाठी समुद्राकडे मार्गस्थ होतील तेव्हा मंडळांच्या कार्यकर्त्यांची खरी कसोटी लागणार आहे.

समुद्राकडे प्रयाण करताना बाप्पांना तीव्र चढ-उतार असलेले उड्डाणपूल, चिंचोळे रस्ते यांसह ठिकठिकाणी रस्त्यांवरील गतिरोधकांना सामोरे जात मार्गक्रमण करायचे आहे त्यामुळे या ठिकाणी कार्यकर्त्यांना आपल्या उत्साहाचा तोल सावरणे अत्यंत गरजेचे असणार आहे. ज्या परळच्या महाराजाची चर्चा गतवर्षी देशभर झाली त्या गणेशमूर्तीचा दुसऱ्या दिवशी समुद्रावर तोल ढळताना साऱ्या महाराष्ट्राने पाहिले. गेल्यावर्षी लालबागचा राजाला सकाळी समुद्रावर यायला विलंब झाला.

ज्यामुळे राजाचे विसर्जन लांबले याचे समस्त वृत्तवाहिन्यांवर थेट चित्रिकरण पाहताना एका बाजूला परळचा महाराजा मंडळाची बॅलन्सिंग मूर्ती हळूहळू कलंडताना पाहून मनाला अतीव दुःख होत होते. दुर्दैवाने यंदा अशा अनेक मुर्त्या पाहाव्या लागणार आहेत. गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव आहे देखाव्याचा नव्हे.

काहीतरी वेगळे करून लोकांना आकर्षित करणे आणि मंडपातील गर्दी वाढवणे यासाठीच लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरु केला होता का ? ज्या देवाच्या नावाने हा उत्सव साजरा केला जातो त्याला काय आवडते ? त्याच्यासाठी काय केले तर तो आपल्यावर कृपा करेल याचा विचार न करता आपण उत्सवाच्या निमित्ताने उंचच्या मुर्त्या आणून त्यांच्या विटंबनेस कारणीभूत ठरत असू, वर्गणीसाठी लोकांची पिळवणूक करत असू, मिरवणुकीत कर्णकर्कश आवाजात डीजे वाजवून इतरांना त्रास देत असू, मंडपात जागरणाच्या निमित्ताने जुगार खेळत असू तर त्या गणपती बाप्पाची आपल्यावर अवकृपा होण्यास वेळ लागणार नाही !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# 'यूपीआय' चा भार

अगोदरच महागाईच्या आगडोंबात जनता होरपळत असतांना असतांना कुठुनही दोन पैशाचा दिलासा तर मिळतच नाही याऊलट जनतेच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे ऐन सणासुदीला साखर, ईतर जिवनावश्यक वस्तुंचे भाव वाढले आहेत, ईराण ईस्त्रायल युद्ध दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत चालले त्याचाही परिणाम आता जाणवु लागला आहे त्यातच भारत रशिया चीन यांच्या कडुन तेल खरेदी करतो म्हणून अतिरिक्त शंभर टक्के कर लावण्याचा निर्णय घेतला आहे परिणामी भारताकडून अमेरिकेत होणाऱ्या वस्तू महाग होणार त्यामुळे अमेरिकेतील ग्राहक इतर देशांकडे वळणार आणि भारतासमोर मोठेच व्यापारी संकट ऊभे रहाणार. आजवर केवळ अमेरिके बरोबरच भारताचा व्यापार फायद्यातला




होता इतर देशाबरोबर व्यापारात भारत निर्यात कमी करतो आणि आयात जास्त करतो त्यामुळे तो घाट्याचा सौदा ठरतो आतातर अमेरिकेकडुन भारताला आयात जास्त करावी लागणार आणि निर्यात कमी होणार यामुळे भारतासमोर मोठेच आर्थिक संकट ऊभे ठाकले आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापारी करार होऊ घातला आहे मात्र त्यातुन भारताच्या हाती काय लागणार हे भविष्यातच ठरेल.

ऐकिकडे देशातील आर्थिक संकट दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत चालले आहे, त्याचा थेट परिणाम जनतेच्या रोजच्या जीवनात होत आहे आता हे संकट अधिकच गंभीर होणार आहे याला कारण म्हणजे पंधरा ऑक्टोबर पासून यूपीआय व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट शुल्क आकारले जाणार आहे. मोठा गाजावाजा करून डिजीटल इंडीया च्या दिशेने वाटचाल करतांना युपीआय व्यवहाराची महती गायली गेली, रोकडीचे व्यवहार करुन बँकांद्वारे व्यवहार होऊ लागले, सुटे पैसे, त्यावरून होणारे वादविवाद टळले, देशातील बहुसंख्य जनतेच्या अंगवळणी यूपीआय पडले, सुरवातीला कोणतेही शुल्क आकारले गेले नाही त्यामुळे जनतेने देखील यूपीआय प्रणालीला ऊस्फुर्तपणे प्रतिसाद दिला. यूपीआय प्रणाली राबविली जाते भारताच्या नॅशनल पेमेंटस् कार्पोरेशन ऑफ इंडिया (एनसीपीआय) च्या माध्यमातून. अनपेक्षितपणे दोन हजार रुपयांवरील व्यवहारांवर टप्प्याटप्प्याने चार्ज आकारणी पंधरा ऑक्टोबर पासून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अर्थात हे यूपीआय शुल्क ग्रहकाकडुन नाही तर व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक यांच्या कडुन आकारले जाणार आहे, त्यातही व्यक्ती व्यक्तीं यूपीआय व्यवहारांवर कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

या शुल्क आकारणीत दोन हजारांहून अधिकच्या व्यवहारावर चा पैसे आकारले जाणार आहेत तर अधिकतम तीनशे रुपये आकारले जाणार आहे. वरवर ही रक्कम किरकोळ वाटत असली तरी युपीआय द्वारे होणाऱ्या व्यवहारावरांची संख्या आणि रक्कम ही लाखोंच्या घरात जाते त्यामुळे ही करोडोंची रक्कम वसुल करुन विदेशी कंपन्यांना फायदा पोहचवला जाणार आहे. याबाबत क्रेडिट कार्ड, व्हिसा कार्ड, यूपीआय प्रणाली राबवणारी यंत्रणां यांच्याकडुन शुल्क आकारणीसाठी दबाब टाकला जात होता, अर्थ मंत्री निर्मला सितारामण यांनी युपीआय वर कुठलेही शुल्क आकारले जाणार नाही असे जाहीर केले होते.महागाई वाढी संदर्भात मी कांदा लसूण खात नाही असे असंवेदनशील वक्तव्य करणाऱ्या निर्मला सितारामन यांनी महागाईच्या झळा कशा लागतील त्यामुळे त्यांना त्यांना जनतेवर पडणाऱ्या आर्थिक बोजाचे गांभीर्य काय कळणार?. असेच असंवेदनशील वक्तव्य निती आयोगाचे एक सदस्य यांनी केले शंभर रुपयांच्या व्यवहारावर चाळीस पैसे दिले तर कुठे बिघडले असे तर्कशास्त्र हे महाशय मांडतात कारण जनतेच्या पैशावर लाखो करोडो रुपयांचा आर्थिक लाभ सोयीसुविधा ही मंडळी घेतात यांना काय पैशाची किंमत कळणार?जनतेवर आर्थिक बोजा पडणार नाही असे कितीही दावे-प्रतिदावे होत असले तरी अखेर हा बोजा जनतेवरच पडणार आहे. अनेकांनी यूपीआय व्यवहारा बंद केले आहे तर काहींनी यूपीआय व्यवहार करतांना अधिकचे पैसे लागतील असे फलकच लावले आहे.

पेट्रोल पंप चालकांच्या संघटनेने देखील विरोध केला आहे. ऐकूणच कॅश व्यवहाराकडुन डिजीटल इंडीया च्या दिशेने झालेली वाटचाल आता पुन्हा एकदा कॅश व्यवहाराकडे होणार का? देशाची नेमकी अर्थ निती तरी काय असा प्रश्न पडतो.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## संस्कृती रक्षक

नवरात्री गणेशोत्सव
प्रयास सर्वत्र अथक
वेगळे काही करायचे
सजले विविध पथक

विविधांगीनृत्यप्रकार
भरत नाट्यम् कथक
सादर करायची कला
ये देशी विदेशी नर्तक

तालमी सुरु जोशात
रंगात रिहर्सल नाटक
रात्रंदिवस झटतात ते
रंगकर्मी भारी काटक

ढोल ताशा ब्रास बॅन्ड
तरबेज कुणी स्नातक
सराव चाले नियमित
सुवर्ण संधीचे सार्थक

गणपती कलांचे दैवत
सिध्दीस नेणारं मंचक
कसली नसे ती बाधा
गजानन संकटमोचक

मुक्तलाभते व्यासपीठ
वैविध्य सादरते रोचक
वाव मिळेकलागुणांना
स्तुतीउधळे आलोचक

बहरली आपली कला
देती दाद जेंव्हा प्रेक्षक
गणेशोत्सवा धन्यवाद
उत्सव संस्कृती रक्षक

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# जलजीवन योजनेचा फज्जा उडाला, केंद्राकडून कोट्यावधी रुपयांचा चुराडा




भारतासारख्या कृषीप्रधान आणि विकसनशील देशात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा केवळ एक प्रशासकीय किंवा तांत्रिक मुद्दा राहिलेला नसून तो थेट मानवी हक्काशी आणि सामाजिक न्यायाशी जोडलेला अत्यंत संवेदनशील विषय बनला आहे.

स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्षे उलटून गेल्यानंतरही देशातील आणि राज्यांच्या ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांना विशेषतः महिलांना आजही पाण्यासाठी दाही दिशा वणवण भटकंती करावी लागत असेल तर हि अत्यंत लज्जास्पद बाब म्हणावी लागेल भारत सरकारची महत्वकांशी जलजीवन योजना पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसून येते आहे. यासाठी केंद्र सरकारने कोट्यावधी रुपयांचा चुराडा केला आहे देशातील जनतेला शुद्ध पिण्याचे पाणी देण्याच्या अनुषंगाने हि योजना राबवली गेली असली तरी प्रत्यक्षात वास्तव वेगळे आहे.

अनेक गावंखेड्यात कुठे नळ जोडणी तर कुठे पायाभरणी, नुसता शुभारंभ, पाण्याचे जलकुंभ उभारणी तर अनेक ठिकाणी या योजनेचा फज्जा उडाला आहे त्यामुळे हि योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होणारं कि नाही ? असा आता सवाल विचारला जात आहे.

आजही काही भागात जेष्ठ नागरिकांना पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ त्यांच्या मनावर आणि शरीरावर मोठा ताण आणणारी आहे डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन मैलोन्मैल चालणाऱ्या महिलांचे चित्र आपल्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे करत नाही का ? एका बाजूला देश चंद्रावर आणि मंगळावर पोहचल्याचे दावे केले जातात तर दुसरीकडे आपल्याच देशातील लोकांना पाण्यासाठी वणवण करावी लागते हा विरोधाभास मनाला वेदना देणारा आहे !

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### रोडरोमिओंचा बंदोबस्त करणार; पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** श्री ढोकेश्वर विद्यालयाच्या प्रवेशद्वार परिसरात शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत पोलीसांची नियमित गस्त राहणार असून विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या रोड रोमिओंचा कडक बंदोबस्त करून सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरण निर्माण केले जाईल, अशी ग्वाही पारनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी दिली.

श्री ढोकेश्वर विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त आयोजित विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना दिवटे म्हणाले, किशोरवय हे अत्यंत नाजूक वळण असते. या वयात शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. कोणताही टोकाचा किंवा घाईघाईचा निर्णय घेऊ नये. आई-वडील व कुटुंबाचा विचार करून संयमाने वागावे. लग्न हे आयुष्यातील महत्त्वाचे पर्व आहे. अल्पवयात घरातून पळून जाण्यासारखे चुकीचे पाऊल उचलू नये. शिक्षण पूर्ण करून योग्य वयात विचारपूर्वक निर्णय घ्यावा.

कार्यक्रमाची सुरुवात सहा.पो.नि.सोमनाथ दिवटे व खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष बाबासाहेब खिलारी यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करून करण्यात आली. या प्रसंगी गोपनीय शाखेचे पोलीस कर्मचारी किरण भापकर, पत्रकार बाळासाहेब गायकवाड, संतोष कोरडे, गणेश जगदाळे, श्रीनिवास शिंदे, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, प्रा.अशोक गांगड, प्रा. नितीन ढोकळे, प्रकाश इघे, अतुल सैद, ग्रंथपाल संदीप खिलारी यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले, तर आभार प्रा.भाऊसाहेब हिंगडे यांनी मानले.

### ढोल-ताशांचा गजर, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष; भक्तिमय वातावरणात बाप्पाला निरोप



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२०, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर शहरात गणेशोत्सवाची सांगता गणेश विसर्जन सोहळ्याने मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमून गेले. विविध गणेश मंडळांसह घरगुती गणरायांच्या मूर्तींचे ढोल-ताशांच्या गजरात व भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले.

गणेश भक्तांनी आकर्षक सजावट केलेल्या गणेशमूर्तींच्या मिरवणुका काढत बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. शहरातील डॉ.साबणे रोड परिसरात विसर्जन मिरवणुका पाहण्यासाठी नागरिक व गणेशभक्तांची मोठी गर्दी झाली होती. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी मिरवणुकीवर लक्ष ठेवत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवली. दरम्यान, नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यास प्राधान्य दिले. उत्साह, भक्ती आणि शांततेच्या वातावरणात गणेशोत्सवाची सांगता झाली.

### नवतरुणांचा स्तुत्य उपक्रम: डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराची केली साफसफाई



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२०, परभणी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसराची व विश्वशांती बौद्ध विहारा जवळील संपूर्ण परिसराची साफसफाई या तरुणांनी उत्स्फूर्तपणे केली.परिसर चकाकला, तरुणांनी घेतला पुढाकारगेल्या काही दिवसांपासून पुतळा परिसरात वाढलेले गवत, कचरा आणि अस्वच्छता दूर करण्यासाठी भीम नगरातील तरुण मुलांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला.

रविवार, दिनांक २० सप्टेंबर रोजी सकाळी सर्व तरुण हातात झाडू, फावडे आणि स्वच्छतेचे साहित्य घेऊन पुतळा परिसरात गोळा झाले. सर्वांनी मिळून परिसरातील कचरा उचलला, प्लास्टिक कचरा गोळा केला जागोजागी कचरा कुंडी उभारून पुतळा परिसर एकदम स्वच्छ व सुंदर बनवला. नागरिकांकडून कौतुक महापुरुषांच्या पुतळ्या जवळील स्वच्छता ठेवणे हे आपले कर्तव्य आहे, अशी भावना या वेळी सहभागी तरुणांनी व्यक्त केली. तरुणांच्या या सामाजिक जाणिवेचे आणि श्रमदानाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत असून, इतर तरुणांसाठी हा एक मोठा प्रेरणादायी संदेश ठरला आहे.

यामध्ये अधिक परिश्रम पंकज इंगोले, धम्मदिप निकाळजे, जीवन ढाकरगे, बाबासाहेब भवाळे, अजय भवाळे, धम्मदिप भवरे, गौरव भवरे , रतन निकाळजे, विकास आल्हाटे, आकाश आल्हाटे, वैभव भवाळे, आकाश भवाळे, सारनाथ भवाळे, करण भवाळे , करण भवरे, कपिल भवरे, करण निकाळजे, विश्वजीत निकाळजे, विश्वदीप निकाळजे, आविष्कार निकाळजे , सुमित भवाळे, सम्राट भवरे, प्रदीप भवरे, विशाल दवंडे, विशाल भवाळे, मंगेश भवाळे ,सचिन भवरे, भागेंद्र पाईकराव, स्वप्नील निकाळजे, करण निकाळजे, आविष्कार निकाळजे ,अभिजीत निकाळजे , सुमित भवाळे, सम्राट भवरे, विशाल दवंडे, विशाल भवाळे, मंगेश भवाळे ,सचिन भवरे, भागेंद्र पाईकराव , सुरेश भवरे , स्वप्नील निकाळजे, राहुल, धम्मदिप निकाळजे, बाबासाहेब भवाळे, अजय भवाळे, धम्मदिप भवरे, गौरव भवरे , रतन निकाळजे, विकास आल्हाटे, आकाश आल्हाटे, वैभव भवाळे, आकाश भवाळे, सारनाथ भवाळे, करण भवाळे , करण भवरे, कपिल भवरे, विश्वजीत निकाळजे, विश्वदीप निकाळजे, आविष्कार निकाळजे , अभिजीत निकाळजे , सुमित भवाळे, सम्राट भवरे, विशाल दवंडे, विशाल भवाळे, मंगेश भवाळे ,सचिन भवरे, राहुल भवाळे , स्वप्नील निकाळजे,सुरेश भवरे, साहिल, सोहम, यांच्या सह भीम अनुयायांना सहभाग घेतला.

# चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत 'सहकार सप्ताह'चा शुभारंभ

### बाबासाहेब वासाडे यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा मानस



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** सहकार क्षेत्राला नवी दिशा देणारे सहकार महर्षी कै.ॲड. बाबासाहेब वासाडे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या ' सहकार सप्ताह-२०२६' (१९ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रधान कार्यालयातील मा.सा. कन्नमवार सभागृहात उत्साहात प्रारंभ झाला. या सोहळ्यात सहकार क्षेत्रातील योगदानाबद्दल माजी जिल्हा परिषद अध्यक्ष वैशाली वासाडे यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. तसेच ॲड. बाबासाहेब वासाडे यांच्यासोबत काम केलेल्या सहकारनिष्ठ सहकाऱ्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार तथा बँकेच्या संचालिका प्रतिभा धानोरकर होत्या. उद्घाटन आ. कीर्तीकुमार उर्फ (बंटी) भांगडिया यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष हशराज अहिर, आ. सुधाकर अडबाले, बँकेचे अध्यक्ष रवींद्र शिंदे, जिल्हा उपनिबंधक जयसिंग ठाकूर, ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे, संजय वासाडे, बँकेचे उपाध्यक्ष संजय डोंगरे, मानद सचिव अवेश खान पठाण उपस्थित होते. याप्रसंगी आ. सुधाकर अडबाले यांनी, बँकेनी घेतलेला सहकार सप्ताहाचा कार्यक्रम कौतुकास्पद असून भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत व्यक्त केले. आ.भांगडिया यांनी, बाबासाहेबांच्या तालिमीत घडलेला कार्यकर्ता हा विताराशी तडजोड न करता एकनिष्ठेनी वावरणारा आहे, असे सांगितले. बाबासाहेब वासाडे यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याचे काम बँकेनी त्वरित हाती घ्यावे, असे सुचविले. तसेच हंसराज अहिर यांनी बाबासाहेब हे सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यास प्रेरणादायी आहेत. त्यांचे विचार शहरी व ग्रामीण भागात खोलवर रुजलेले आहेत, असे मत व्यक्त केले.

खा.धानोरकर म्हणाल्या, बाबासाहेबांनी सुरु केलेले कार्य समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम बँक करीत आहे, हीच हीच खरी बाबासाहेबांना मानवंदना आहे आणि बँकेनी बाबासाहेबांच्या स्मृतीप्रित्यर्थ जिल्हा बँकेच्या वतीने संपूर्ण जिल्हा बँकेच्या शाखा व सहकारी संस्था येथे सहकार सप्ताहाचे आयोजन करुन सहकार चळवळ मजबूत करण्याचे काम करीत आहे. त्यासाठी सहकारी निष्ठ सहकाऱ्यांनी सहकार चळवळीतून ग्रामीण, गरजू आणि होतकरु समाजाचा व बचतगटातील महिलांचा विकास साधावा, असे मत व्यक्त केले.

यावेळी बँकेचे संचालक सुदर्शन निमकर, गणेश तर्वेकर, रोहित बोम्मवार, गजानन पाथोडे, जयंत टेमुर्डे, निशीकांत बोरकर, दिनेश चोखारे, उल्हास करपे, यशवंत दिघोरे, डॉ. ललित मोटघरे, दामोदर मिसार, डॉ. अनिल वाढई, नंदा अल्लूरवार, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर कल्याणकर, यांच्यासह बाबासाहेबांना माननारा वर्ग शेतकरी, बचतगटातील महिला, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात दुष्काळ जाहीरकरून पीक विमा द्या - स्वप्निल अण्णा जाधव

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२०, उदगीर (लातूर) :** उदगीर गेल्या वर्षीपासून उदगीर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. कधी आसमान इतर कधीच सुलतानी संकटांनी शेतकरी नागावला जात असताना सत्ताधारी सरकार मात्र केवळ घोषणाबाजी करत सुटले आहे. शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी असताना शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पिक पाहणी चे नाटक करणे चुकीचे आहे. हे सर्व थांबून शेतकऱ्यांना तात्काळ एकरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी. अशी आग्रही मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर विधानसभा प्रमुख स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली आहे.

लातूर जिल्ह्यात पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप पिके पूर्णपणे हातची गेली आहेत. जून ते ऑगस्ट अखेरपर्यंत तालुक्यात सरासरी सुमारे



७०० मिलिमीटर पर्जन्यमान अपेक्षित असताना यंदा केवळ १८८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पावसाने तब्बल ४० दिवसांची उघडीप दिल्याने सोयाबीन, तूर, मूग, उडीद व खरीप ज्वारी ही पिके मुळापासून वाळून गेली आहेत. त्यामुळे आता पाऊस झाला तरी या पिकांना पुन्हा उभारी मिळण्याची शक्यता नसल्याने जिल्ह्या दुष्काळ जाहीरकरून १०० टक्के विमा देण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर विधानसभा प्रमुख स्वप्नील अण्णा जाधव यांनी केली आहे.

पर्जन्यमानातील मोठी तूट आणि पिकांची झालेली अवस्था पाहता महसूल प्रशासनाने केवळ कार्यालयीन नोंदींवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सद्यस्थितीची वस्तुनिष्ठ नोंद करावी, पीक कापणी प्रयोगाच्या कालावधीपर्यंत बहुतांश पिके पूर्णपणे कोलमडून गेली आहेत. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने अंतिम आणेवारी काढल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नजरी आणेवारी अंतिम आणेवारी मानून त्याला पर्जन्य त्रुटीची जोड द्यावी, तसेच शेतकऱ्यांना १०० टक्के पीकविमा आणि एनडीआरएफच्या निकषानुसार शासकीय मदत व सवलती देण्यात याव्यात, अशीही मागणी स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली. दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ही होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करणे, पीक कर्जावरील व्याजमाफी देणे, पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, शेतकरी आणि शेतमजुरांच्या हाताला काम मिळावे यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत आवश्यक कामे तातडीने मंजूर करून सुरू करावीत, तसेच पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता करून देणे आवश्यक असल्याचे स्वप्निल अण्णा जाधव यांनी सांगितले. गरज भासल्यास चारा छावण्या सुरू कराव्यात, अशीही मागणी त्यांनी केली. गेल्या वर्षी ओला दुष्काळ आणि यंदा कोरडा दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जाच्या जोखडातून दिलासा देण्यासाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या चालू कर्जाबाबत शासनाने तातडीने कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी ही स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली आहे.

# गणेशोत्सवात महाप्रसाद तयार करण्यासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडर सक्तीचा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, ठाणे :** आगामी गणेशोत्सव तसेच इतर सार्वजनिक उत्सवांच्या काळात आयोजित केल्या जाणाऱ्या महाप्रसाद आणि भोजनासाठी आता केवळ व्यावसायिक (कमर्शियल) गॅस सिलेंडरचाच वापर करणे बंधनकारक असणार आहे.

सणासुदीच्या काळात घरगुती गॅस सिलेंडरचा होणारा गैरवापर थांबवण्यासाठी आणि संभाव्य भीषण आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी ठाणे सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी योगेश जंगले यांनी जिल्ह्यातील सर्व तहसिललदारांना यासंबंधीचे आवश्यक सूचना दिल्या आहेत. अनेक सार्वजनिक गणेश मंडळे अज्ञानापोटी किंवा दुर्लक्षामुळे महाप्रसादाचा स्वयंपाक करताना सर्रास घरगुती सिलेंडरचा वापर करतात. मात्र, घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या क्षमतेत, बर्नरमध्ये आणि गॅसच्या प्रेशरमध्ये मोठा फरक असतो. मोठ्या प्रमाणावर अन्न शिजवताना घरगुती सिलेंडरचा वापर केल्यास स्फोट होऊन मोठी जीवित आणि वित्तहानी होण्याचा धोका निर्माण होतो. अशा दुर्घटनेत घरगुती गॅसचा बेकायदेशीर वापर आढळल्यास विम्याचे संरक्षण ही नाकारले जाते. शिवाय, सार्वजनिक कामांसाठी घरगुती सिलेंडर वापरणे हा 'जीवनावश्यक वस्तू कायद्या'नुसार गंभीर गुन्हा असून अपघात घडल्यास संबंधित मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होऊ शकतात; तसेच यामुळे शासनाच्या महसुलाचेही मोठे नुकसान होते.

या सर्व गंभीर बाबींची दखल घेत प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. आता महापालिका, पोलीस प्रशासन आणि पुरवठा विभागामार्फत गणेश मंडळांना मंडप, ध्वनी किंवा महाप्रसादाची परवानगी देताना 'केवळ व्यावसायिक सिलेंडर वापरणे बंधनकारक राहील' ही अट अधिकृत परवानगी पत्रातच स्पष्ट नमूद केली जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पोलिसांनी संयुक्त परिपत्रक काढून मंडळांना याबाबत पूर्वकल्पना द्यावी आणि तहसिलदारांनी आपल्या तालुक्यातील मंडळांना सूचित करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने जिल्हा कार्यालयाकडे सादर करावा, असे स्पष्ट आदेश जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

प्रशासनाच्या या निर्णयाचे स्वागत करताना ग्राहक दक्षता कल्याण फाऊंडेशनचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके (संपर्क क्र. ७७२२० ३१४७१) यांनी श्रीगणेशोत्सव हा आपला अत्यंत पवित्र आणि आनंदाचा सण आहे, पण महाप्रसाद तयार करताना सुरक्षेशी अजिबात तडजोड केली जाऊ नये. घरगुती आणि व्यावसायिक सिलेंडरच्या क्षमता तसेच बर्नरच्या प्रेशरमध्ये जमीन-आस्मानचा फरक असतो.

महाप्रसादाच्या मोठ्या भांड्यांसाठी घरगुती सिलेंडर वापरणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. जिल्हा प्रशासनाने आमच्या मागणीची दखल घेऊन हा कडक निर्णय लागू केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. बाप्पाचा हा उत्सव प्रत्येकासाठी सुरक्षित आणि निर्विघ्न पार पडावा, यासाठी सर्व गणेश मंडळांनी कायद्याचे पालन करत केवळ व्यावसायिक सिलेंडरचाच वापर करावा. अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# वर्धा येथे होणार शालेय विभागीय ज्युदो स्पर्धा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** विभागीय क्रीडा संकुल मानकापूर नागपूर येथे संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धेत खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील ज्युदोपटूंनी कौतुकास्पद कामगिरी करून आपापल्या वयोगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. १४ वर्ष वयोगटात मुलींमध्ये२७ किलो खालील विधी दमके प्रथम,३२ किलो खालील भाविका मेश्राम प्रथम,३६ किलो खालील कशिश मेश्राम प्रथम,४० किलो खालील प्रगती मेश्राम प्रथम,

**१४ वर्ष वयोगटात मुलांमध्ये**

३५ किलो खालील विष्णू केळवदे प्रथम,

**१७ वर्ष वयोगटात मुलींमध्ये**



४८ किलो खालील भुमिका मेश्राम प्रथम,६३ किलो खालील उन्नती भोसकर प्रथम,

**१७ वर्ष वयोगटात मुलांमध्ये**

४५ किलो खालील नकुल बर्मन प्रथम,५५ किलो खालील आदित्य रेवतकर प्रथम,१९ वर्ष वयोगटात मुलींमध्ये४० किलो खालील कशिश गोडबोले प्रथम,

**१९ वर्ष वयोगटात मुलांमध्ये**

५५ किलो खालील हर्ष सिदुरकर प्रथम,६० किलो खालील प्रांजल बर्वे प्रथम,७३ किलो खालील कुशल आवळे प्रथम तर अनिशा गोडबोले, श्री.बर्वे व कबिर बघेल यांना मात्र द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले वरील सर्व प्राविण्य प्राप्त खेळाडूंना क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. वर्धा येथे होणाऱ्या शालेय विभागीय ज्युदो स्पर्धेत नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार,सचिव सुहासताई केदार, कोषाध्यक्ष संध्या ठाकरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे ,पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी ज्युदोपटूंचे अभिनंदन केले.

# बांबू केवळ वनसंपदा नव्हे, तर रोजगार-उद्योगाचा 'कल्पवृक्ष' - आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** माणसाच्या जगण्याच्या असंख्य गरजांशी निसर्गाने जोडलेली काही मोजकीच साधने आहेत; त्यापैकी बांबू हा केवळ एक वनस्पती नसून अन्नापासून निवाऱ्यापर्यंत, शेतीपासून उद्योगापर्यंत आणि रोजगारापासून अर्थव्यवस्थेपर्यंत अनेक शक्यतांची दारे उघडणारा बहुगुणी स्रोत आहे.




ग्रामीण, आदिवासी आणि वनक्षेत्रातील हजारो हातांना काम देण्यापासून मोठ्या उद्योगांना कच्चा माल उपलब्ध करून देण्यापर्यंत बांबूमध्ये विकासाचे मोठे सामर्थ्य दडलेले आहे. या सामर्थ्याकडे केवळ वनसंपत्ती म्हणून नव्हे, तर 'वन ते धन' या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज अधोरेखित करत माजी वनमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बांबूचे महत्त्व स्पष्ट केले. बांबू केवळ वनसंपदा नव्हे, तर रोजगार-उद्योगाचा 'कल्पवृक्ष' असे ते म्हणाले.

जागतिक बांबू दिवसाच्या निमित्ताने चंद्रपूर येथील वन अकादमीमध्ये आयोजित कार्यक्रमाला अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आर. एम. रामानुजन, बी.आर.टी.सी.चे संचालक उमेश वर्मा, सहाय्यक संचालक हनुमंत जाधव, डाक विभागाचे संचालक डॉ. सुधीर जाखेरे, बी.आर.टी.सी.च्या शैक्षणिक सल्लागार डॉ.तारिका दगडकर तसेच एफ.डी.सी.एम.च्या प्रादेशिक व्यवस्थापक दिव्या भारती आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी आ.सुधीर मुनगंटीवार यांनी बांबूपासून साकारलेल्या विविध कलात्मक व उपयुक्त वस्तूंच्या प्रदर्शनाची पाहणी केली. बांबूच्या माध्यमातून पारंपरिक कौशल्याला आधुनिक बाजारपेठेची जोड देत रोजगार, उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देण्याची क्षमता या प्रदर्शनातून प्रकर्षाने अधोरेखित झाली.आज चंद्रपूरमधील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राने देशातील बांबूविषयक ज्ञान, संशोधन आणि प्रशिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

***चंद्रपूरचे केंद्र, देशाचे बांबू हब बनावे***

देशातील तसेच परदेशातील बांबूविषयक संस्था, विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांशी सामंजस्य करार करून संशोधनाला गती देण्याची गरज आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. चंद्रपूरमध्ये बांबू संशोधनासोबतच उत्पादन, प्रक्रिया, डिझाइन, मूल्यवर्धन आणि प्रशिक्षणाची मजबूत परिसंस्था उभी राहिली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.बांबूपासून तयार होणाऱ्या उत्पादनांच्या जागतिक बाजारपेठेत चीनचा मोठा सहभाग असल्याचा उल्लेख करत त्यांनी भारताने या क्षेत्रात आपली क्षमता वाढविण्याची गरज व्यक्त केली. चंद्रपूरमधील संशोधन आणि उत्पादन केंद्रांना अधिक सक्षम करून बांबूच्या क्षेत्रात भारताची स्पर्धात्मक ताकद वाढविणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

***'वन प्रॉडक्ट वन डिस्ट्रिक्ट' मध्ये बांबूला महत्त्वाची भूमिका***

चंद्रपूर जिल्ह्याचा सकल जिल्हा उत्पादन (जीडीपी) वाढविणे हे उद्दिष्ट असून त्यासाठी बांबू उद्योग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले. 'वन प्रॉडक्ट वन डिस्ट्रिक्ट' या संकल्पनेत बांबूला प्रभावी स्थान देता येईल.

बांबूच्या माध्यमातून स्थानिक उत्पादनाला बाजारपेठ, शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न आणि युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.बांबूच्या नव्या प्रजाती, नर्सरी, लागवड, उत्पादन, प्रक्रिया, डिझाइन, मूल्यवर्धन आणि विपणन या प्रत्येक टप्प्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. बांबूपासून तयार होणारी उत्पादने डी-मार्ट, ॲमेझॉन, रिलायन्स यांसारख्या मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी विपणन व्यवस्था उभी करण्याची आवश्यकता आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

***जागतिक बांबू दिन संकल्पाचा दिवस ठरावा***

जागतिक बांबू दिन हा केवळ कार्यक्रम, भाषणे आणि पुरस्कारांपुरता मर्यादित न राहता भविष्यातील कामाचा संकल्प करण्याचा दिवस ठरला पाहिजे, असे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले. पुरस्कारप्राप्त विद्यार्थी आणि संशोधकांनी पुढेही संशोधन, नवकल्पना आणि प्रयोगशीलतेवर सातत्याने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बांबूला 'ग्रीन गोल्ड' संबोधत त्याचा शाश्वत विकास, रोजगार आणि अर्थव्यवस्थेशी संबंध जोडण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. स्थानिक पातळीवर रोजगार आणि उद्योगनिर्मिती करून देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हीदेखील देशसेवाच आहे, असे सांगत बांबूच्या माध्यमातून चंद्रपूरच्या विकासाला नवी आर्थिक दिशा देण्याचा निर्धार आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

# कृषी अधिकाऱ्यांनी केली पाहणी; औषध फवारणीबाबत प्र.तालुका कृषी अधिकारी यांचे मार्गदर्शन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** वातावरणाच्या बदलामुळे सध्या धानावर किडीचा प्रादुर्भाव झाला आहे. याची दखल घेत प्र. तालुका कृषी अधिकारी गणेश गवळी यांनी तालुक्यातील आष्टा,चेक पोंभुर्णा, पोंभुर्णा,बोर्डा बोरकर, देवाडा खुर्द आणि चिंतलधाबा या गावांमधील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. धान पिकावरील औषध फवारणी व संरक्षण नियोजनाबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले.

सध्या दमट वातावरणामुळे धानावर कडा करपा आणि खोडकीडा यासारख्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर गणेश गवळी यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि रोगांपासून संरक्षण करण्यासाठी योग्य रसायनांची निवड व वेळेवर फवारणी करणे अत्यंत आवश्यक आहे. पानांच्या कडांवर तपकिरी डाग पडणे, पाने सुकणे यासारखी 'कडा करपा' रोगाची लक्षणे दिसल्यास कॉपर ऑक्झिक्लोराईड ५० टक्के एसपी. किंवा स्ट्रेप्टोसायक्लीन या औषधांचा योग्य मात्रेत वापर करावा. जेणेकरून पिकांचे होणारे नुकसान टाळता येईल. कडा, करपा आणि खोडकीड्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची सविस्तर माहिती त्यांनी




शेतकऱ्यांना दिली. कडा करप्यामुळे पानांवर लांबट डाग पडणे, पिवळेपणा येणे कडा करपा हा जीवाणूजन्य रोग असल्याने एक एकर साठी कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०% एस.पी.२५ ग्रॅम अधिक स्ट्रेप्टोसायक्लीन ६ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात वापर फायदेशीर ठरतो. सध्या धान फुटवे अवस्थेत असताना खोड किडीचा प्रादुर्भाव होऊन खोड किडी खोडात छिद्रे पडून रोपे कोमेजण्याच्या समस्येवर कार्टाप हायड्रोक्लोराइड ५०% एसपी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा फिप्रोनील ५% एस ३० मिली १५ लिटर पाण्यात मिसळून धानाच्या बुडा पर्यंत जाईल अशा प्रकारे फवारणी करावी यांसारख्या औषधांची शिफारस त्यांनी केली. कृषी अधिकारी प्र.तालुका कृषी अधिकारी गणेश गवळी यांनी शेतकरी बांधवांना रासायनिक औषध फवारणी करताना घ्यावयाच्या सुरक्षिततेच्या उपायांची विशेष आठवण करून दिली. फवारणी करताना नेहमी संरक्षक पोषाख, तोंडाला मास्क लावण्याचे आवाहन केले.

# 'सुतारदऱ्याचा राजा' शिवसाई मित्र मंडळ ट्रस्ट तर्फे भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन

**अक्षराज : विठ्ठल निकाळजे**

**दि.२०, कोथरूड (पुणे) :** सामाजिक बांधिलकी आणि जनसेवेचे व्रत निरंतर जपणाऱ्या कोथरूड परिसरातील 'शिवसाई मित्र मंडळ ट्रस्ट (सुतारदऱ्याचा राजा)' च्या वतीने रविवारी (२० सप्टेंबर) भव्य रक्तदान शिबिराचे अतिशय उत्साहात आयोजन करण्यात आले. रुग्णालयांमध्ये भासणारी रक्ताची टंचाई दूर व्हावी आणि गरजू रुग्णांना वेळेत रक्तपुरवठा व्हावा, या उदात्त हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थापक भारतभाऊ सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर शिवसाई नगर, सुतारदरा, कोथरूड येथे पार पडले. रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून



एका व्यक्तीचे रक्तदान तीन रुग्णांचे प्राण वाचवू शकते, हा विचार मनात ठेवून परिसरातील नागरिक, व्यापारी व विशेषतः तरुण वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान केले.

तज्ज्ञ डॉक्टर व वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली अत्यंत सुरक्षित व स्वच्छ वातावरणात ही रक्तदान प्रक्रिया पूर्ण झाली. सहभागी सर्व रक्तदात्यांना अधिकृत रक्तदान प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच त्यांच्यासाठी चहा व पौष्टिक अल्पोपहाराची विशेष सोय करण्यात आली होती.

उपक्रमाला मिळालेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल मंडळाचे अध्यक्ष अनिकेत गुजर व उपाध्यक्ष साहिल खानेकर यांनी सर्व रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कार्याध्यक्ष सतीश शिंदे, तसेच महेश चरवड, भागवत लांडगे, प्रणय साठे, सौरभ ठोंबरे, निखिल फाले, श्रीरंग गायकवाड, राजकुमार तिडके यांच्यासह शिवशाही मित्र मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पनवेलमध्ये भावपूर्ण वातावरणात गौरी गणपतींना निरोप

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, पनवेल :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागांसह नावडे उपविभागात सुमारे ११ हजार २८० घरगुती गौरी गणपती तसेच सार्वजनिक गणपतींचे भक्तिमय वातावरणात शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने विसर्जन करण्यात आले.

'माझी वसुंधरा ७.०' अंतर्गत स्वच्छ, सुंदर व प्रदूषणमुक्त पनवेलसाठी महापालिकेने 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' ही मोहीम राबवली. महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशभक्तांसाठी बांधकाम, आरोग्य, विद्युत, परवाना, भांडार, वाहन, वैद्यकीय व पर्यावरण विभागांच्या समन्वयातून विसर्जन घाटांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. विविध एनजीओ व सामाजिक संस्थांनीही सहकार्य केले.

महापालिकेच्या बांधकाम विभागातर्फे यंदा एकूण १०६ ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली. त्यापैकी २९ नैसर्गिक विसर्जन स्थळे, तर ७७ ठिकाणी कृत्रिम तलावांची सुविधा करण्यात आली. या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटीव्ही, स्टेज, टॉवर, टेबल-खुर्च्या, लाऊडस्पीकर, निर्माल्य कलश व लाइफ जॅकेटची व्यवस्था करण्यात आली होती.



विसर्जन सुरळीत पार पडण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांनी विविध विसर्जन स्थळांना भेटी देऊन पाहणी केली. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, स्वरूप खारगे, रविकिरण घोडके, नानासाहेब कामठे, अभिषेक पराडकर, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर तसेच प्रभाग अधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली. अग्निशमन दल, वाहतूक, विद्युत, बांधकाम, घनकचरा व आरोग्य विभाग तसेच पोलिस विभागाने विसर्जन स्थळांवर चोख बंदोबस्त ठेवला. वैद्यकीय विभागातर्फे प्रत्येक विसर्जन स्थळी प्राथमिक उपचाराची सुविधा उपलब्ध करण्यात आली. कृत्रिम तलावात विसर्जन करणाऱ्या नागरिकांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या

# हिंदी भाषा संस्कृती व एकात्मतेची ओळख - प्राचार्य खिलारी
## श्री ढोकेश्वर विद्यालयात हिंदी भाषा दिन साजरा

**अक्षराज : वसंत रांधवण**




**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** देशाची एकता आणि अखंडता टिकवण्यासाठी हिंदी भाषेचा सन्मान केला पाहिजे. तिचा योग्य वापर करणे आपले कर्तव्य आहे. हिंदी भाषा लोकांना एकसंघ करण्याचे काम करते. हिंदी केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपल्या संस्कृतीची व एकात्मतेची ओळख असल्याचे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले. श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय हिंदी दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी हिंदी भाषेचे थोर साहित्यिक मुंशी प्रेमचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांच्या साहित्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर वेद दाते, वैष्णवी ठुबे, भक्ती खैरे, समृद्धी जांभळकर, ज्ञानेश्वरी उदावंत,वेदिका वाळुंज,प्रियल झावरे, मनस्वी झावरे या विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे राष्ट्रीय स्तरावरील व दैनंदिन जीवनातील महत्त्व विशद केले.

हिंदी दिनाच्या निमित्ताने विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व सुदंर हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक समिती, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानदा पायमोडे हिने केले. सूत्रसंचालन वैभवी कटारिया व आराध्या कडुसकर यांनी केले. तर आभार समृध्दी जांभळकर हिने मानले.

# खापरखेड्यात विश्वकर्मा पूजन समारोह भक्तिमय वातावरणात थाटात संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१९, नागपूर :** भगवान विश्वकर्मा जयंतीनिमित्त स्थानिक कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन, खापरखेडा यांच्या वतीने आयोजित श्री विश्वकर्मा पूजन समारोह नुकराताच विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. हनुमान मंदिर, रोपवे कॉलनी (सात बिल्डिंग), छत्रपती संभाजी महाराज उद्यान, मेन रोड, खापरखेडा येथे झालेल्या समारोहाला नागरिक, भाविक तसेच खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातील अधिकारी-कर्मचारी, कंत्राटी कामगार व कंत्राटदारांची मोठी उपस्थिती लाभली.भगवान विश्वकर्मा यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व विधिवत पूजन करण्यात आले. सायंकाळी विश्वकर्मा आरती व जस गायनाचा कार्यक्रम झाला. हवन व पूजन विधी पार पडला. त्यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वरुची महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.समारोहाला खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे, उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, सचिन देगवेकर, किशोर सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता विलासकुमार उके, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, सरपंच मीनाक्षी तागडे तसेच खापरखेडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदीप बुवा यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारोहाचे आयोजन स्थानिक कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या वतीने करण्यात आले. सुनील पांडे, कार्याध्यक्ष जयंत झिंगरे यांच्यासह नितीन पुरी, हरीश लोळेकर, आशिष पवनीकर, दिनेश चिखले, बाळू पाठराबे, अरविंद चिकनकर, किशोर खोरगडे, दीपक भुरकुंडे, किशोर तांडेकर, मनोज बागडे, विकास सोनवणे, नानू शेंडे, नरेश पानतावणे, किशोर लाडकर, हेमराज राऊत, अशोक वंजाळ, दिनेश लोळेकर, उमेश गजभिये, रोशन बागडे यांच्यासह असोसिएशनच्या पदाधिकारी, सदस्य व कंत्राटदारांनी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.दोन दिवसांच्या समारोहात पूजन, आरती, जस गायन, हवन व महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. महाप्रसादानंतर धार्मिक विधी पूर्ण करून भगवान विश्वकर्मा यांच्या मूर्तीचे विधिवत विसर्जन करण्यात आले. आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार, कंत्राटदार, नागरिक व भाविकांचे आयोजकांनी आभार मानले.

# जीवन धाराच्या वतीने माझगावमध्ये नशामुक्ती जनजागृती रॅली

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.२०, माझगाव (मुंबई) :** नशेच्या वाढत्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करून युवकांनी व्यसनापासून दूर राहावे, या उद्देशाने जीवन धारा संस्थेच्या वतीने भारत नशा मुक्त अभियान अंतर्गत रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी माझगाव परिसरात नशामुक्ती जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये शाळा व महाविद्यालयातील शंभरहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीमध्ये जाईंट ग्रुप ऑफ पर्ल मुंबईचे सदस्य तसेच भायखळा पोलीस ठाण्याचे पोलीस इन्स्पेक्टर गिते, पीएसआय नतुरे आणि त्यांचे सहकारी सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी हातात नशामुक्तीचा संदेश देणारे फलक घेत घोषणांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती केली.

रॅलीदरम्यान जीवन धारा संस्थेच्या मुलांनी परिसरातील विविध चौकांमध्ये पथनाट्य सादर केले. या पथनाट्यांच्या माध्यमातून तंबाखू, दारू, अमली पदार्थ आणि इतर व्यसनांमुळे होणारे शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक दुष्परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आले. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, आरोग्य आणि सकारात्मक जीवनशैलीकडे वळावे, असा संदेश या माध्यमातून देण्यात आला. रॅलीच्या समारोपावेळी भायखळा पोलीस ठाण्याचे पोलीस इन्स्पेक्टर गिते सर यांनी उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना नशामुक्तीबाबत मार्गदर्शन केले. व्यसनामुळे व्यक्तीच्या आरोग्यावर तसेच कुटुंबावर आणि समाजावर होणाऱ्या परिणामांची माहिती देत त्यांनी युवकांनी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ रॅलीमध्ये सहभाग नोंदवला नाही, तर पथनाट्याच्या माध्यमातून समाजात नशामुक्तीचा संदेश पोहोचविण्याचे काम केले. विद्यार्थी, सामाजिक संस्था, स्वयंसेवक आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात आलेल्या या जनजागृती उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.